## परिपत्रक क्रमांक 247

**विषय :- डिपॉझिट रकमा शासनाच्या परवानगी शिवाय संबधितांना परत करणेविषयी.**

धर्मादाय संघटनेच्या सर्व विभागीय कार्यालयांत जाहिरात प्रसिध्दीकरण, नककल फी, प्रोसेस फी वगैरेकरीता विश्वस्तांकडून अनामत रकमा सार्वजनिक न्यास प्रशासन निधीत जमा केल्या जातात. अशा रकमा काही वेळा परत (रिफंड) करण्याचा प्रश्न निर्माण होतो. तथापि, शासनाच्या परवानगीशिवाय अशा रकमा परत करता येत नाहीत. तेव्हा कार्यालयीन कामकाजाच्या सोयी करीता व रिफंड प्रकरणांचा विलंब टाळण्याकरीता अशा प्रकारच्या परताव्याच्या रकमा (रिफंडेबल अमाऊंटस) विभागीय अधिकाऱ्यांनी योग्य तो निर्णय घेऊन परस्पर परत करण्यांस हरकत नाही. परंतू शासनाच्य मंजूरी शिवाय केलेल्या खर्चाला कार्योत्तर मंजूरीची आवश्यकता असल्यामुळे वर्ष अखेरीस अशा सर्व परत केलेल्या परताव्याच्या रकमांचा तपशील शासनाच्या कार्योत्तर मंजूरीकरीता धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत शासनाकडे पाठवणे आवश्यक आहे.

अ.द.काळे,
धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

दिनांक 14 नोव्हेंबर, 1984.